# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,

पोलीस मुख्यालय आडगाव, नाशिक-पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०

**E.Mail- pilcbnskr@gmail.com**


---

**प्रेसनोट** दिनांक:- २०/०९/२०१८

## ''एक गाव एक गणपती'' योजने अंतर्गत गणेश मंडळांनी दिला सामाजिक एकतेचा संदेश पोलीस अधीक्षकांचे आवाहनास गणेश मंडळांचा प्रतिसाद

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री.संजय दराडे सो** यांचे संकल्पनेतुन राबविण्यात येणा-या विघ्नहर्ता गणेशोत्सव बक्षिस योजने अंतर्गत ''एक गाव एक गणपती'' उपक्रमास गणेश मंडळांनी उत्स्फुर्त प्रतिसाद नोंदविला आहे. या उपक्रमाअंतर्गत ग्रामीण भागातील **एकुण १०२३** गावांनी सहभाग घेवुन मोठया प्रमाणात प्रतिसाद दिला आहे. गणेशोत्सवा दरम्यान सार्वजनिक शांततेला बाधा पोहचु नये यासाठी पोलीस प्रशासनातर्फे तंटा मुक्ती समितीचे सहाय्याने 'एक गाव एक गणपती' हा उपक्रम सर्वत्र राबविण्यात येत आहे. सदर उपक्रम राबविल्यामुळे गावा-गावांमध्ये शांतता स्थापित होऊन जातीय सलोखा निर्माण होत आहे.

तसेच गणेशोत्सव काळात डाल्बी/ डी.जे.चे आवाजाचा सर्वसामान्य नागरीक, रुग्ण, महिला, लहान मुले व वृध्द व्यक्तींना त्रास होवु नये व ध्वनीप्रदुषणास आळा बसावा यासाठी जिल्हयातील विविध पोलीस ठाण्यांतर्फे शाळा महाविद्यालयांमध्ये चित्रकला स्पर्धा, निबंध व वक्तृत्व स्पर्धा, प्रचार फे-या, पथनाटये आयोजित करून जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पोलीस अधीक्षकांच्या संकल्पनेतुन निर्मित केलेल्या ''SAY NO to DJ'' चित्रफितीव्दारे विविध गावांमध्ये जनजागृती करण्यात येत असुन ध्वनिप्रदुषणास आळा बसविण्यात आला आहे. विविध गावांमध्ये जातीय सलोखा कायम रहावा, तसेच गणेश उत्सव मंडळांनी विशेषत: तरूणांनी सामाजिक बांधीलकीची जाणीव ठेवुन सामाजिक एकोपा वृध्दींगत होईल असे संदेश समाजात प्रसारित करावे यासाठी सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम घेण्यात आले आहे.

दरम्यान काल दि. १९/०९/२०१८ रोजी मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. यांनी ओझर व पिंपळगाव येथील गणेश मंडळांना भेट दिली. **ओझरचा राजा गणेश** मंडळाने यावर्षीही विविध सांस्कृतिक कार्यक्रम राबवुन शालेय विद्यार्थ्यांना गणवेश व वहया-पुस्तके वाटप कार्यक्रम, वृक्षारोपन तसेच रक्तदान शिबीराचे आयोजन केलेले आहे. तसेच **मुखेड, ता.निफाड** येथील **एक गाव एक गणपती** योजने अंतर्गत गावातील नागरीकांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमास मा. पोलीस अधीक्षक सो यांनी भेट दिली, यावेळी गावातील आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांना शालेय वस्तुंचे वाटप करण्यात आले. **पिंपळगाव येथील नॅशनल हायवे गणेश** मंडळासही मा.पोलीस अधीक्षक सो यांनी भेट देवुन मंडळाने राबविलेल्या विविध कार्यक्रमांची प्रशंसा केली. जिल्हयातील **'एक गाव एक गणपती'** योजने अंतर्गत विविध मंडळांनी यावर्षीही समाज प्रबोधन कार्यक्रम, राष्ट्रीय एकात्मता, रक्तदान शिबीर, स्त्री भ्रुण हत्येबाबत जनजागृती, तसेच गोर-गरीब विद्यार्थ्यांना वहया-पुस्तके- गणवेशांचे वाटप, तसेच पाणी अडवा-पाणी जिरवा, जंगल संरक्षण असे विविध कार्यक्रम राबवुन गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे संकल्पनेतुन चालुवर्षीचे गणेशोत्सवा दरम्यान राबविण्यात येणा-या **विघ्नहर्ता बक्षिस योजनेअंतर्गत** जिल्हयातील विविध गावांमधील एक गाव एक गणपती व तालुका स्तरीय सार्वजनिक गणेश मंडळांनी सादर केलेली गणेश आरास, उत्कृष्ट सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक एकता, राष्ट्रीय एकात्मतेवर आधारीत देखावे, बेटी बचाव, ग्राम स्वच्छता अभियान यावर आधारित देखावे / कार्यक्रम सादर करणा-या गणेश उत्सव मंडळांना **ग्रामीण पोलीस दलातर्फे बक्षिसे प्रदान** करण्यात येणार आहे.

ओझर, पिंपळगाव शहरातील गणेश मंडळांनी आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमास नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संयज दराडे सो**. यांचेसह अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो,** उपविभागीय पोलीस अधिकारी **श्री. अतुल झेंडे सो.** व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी व कर्मचारी असे उपस्थित होते.